# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०७/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

## नागपूर ग्रामीण हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या व जुगार खेळणारे आरोपीतांविरूद्ध कारवाई

दि. २५/०७/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता **आरोपी नामे– चंद्रशेखर लक्ष्मण बोबडे, वय ६५ वर्ष रा. वार्ड नं. ३ केळवद ता. सावनेर** हा सार्वजनिक ठिकाणी मुंबई वरून खूलणाऱ्या कल्यान, खजाना या सट्टापट्टीचे बोगस आकडयावर लोकांकडून पैसे व नंबरचा चिट्ठया स्विकारून हारजितचा जुगार खेळ खेळीत असताना, त्याच्या कडून नगदी ८००/– रू, एक पांढ–या कागदावर निळया पेनाने खजाना कल्यान असे लिहलेली चिट्ठी एक पेन असा एकूण ८००/– रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध पोलीस ठाणे केळवद येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोस्टे काटोल अंतर्गत **आरोपी नामे– अजय सुरेशराव बांबल, वय ४५ वर्ष रा. मेंढेपठार** हा मेंढेपठार रोडवर सार्वजनिक ठिकाणी मेंढेपठार या ठिकाणी सट्टापट्टीचे बोगस आकडयावर लोकांकडून पैसे घेवुन हारजितचा जुगार खेळ खेळवताना मिळुन आल्याने नमुद घटनास्थळी रेड कारवाई करून आरोपीचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य एक पेन व नगदी ४९० रू असा एकुण ४९० रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच काटोल येथील पारडसिंगा येथे बस स्टॉपच्या मागे आरोपी सुभाष लक्ष्मण नागदेवे वय ५४ वर्ष रा. पारडसिंगा हा सट्टापट्टीचे बोगस आकडयावर लोकांकडून पैसे घेवुन हारजितचा जुगार खेळ खेळवताना मिळुन आल्याने आरोपीकडुन सट्टापट्टी साहित्य एक पेन व नगदी ६५० रू असा एकुण ६५० रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोस्टे रामटेक अंतर्गत भंडारबोडी येथे बस स्टॉप जवळ **आरोपी नामे– विनायक फजीत बरडे वय ३९ वर्ष रा. भंडारबोडी ता. रामटेक जि. नागपुर** हा सट्टापट्टीचे बोगस आकडयावर लोकांकडून पैसे घेवुन हारजितचा जुगार खेळ खेळवताना मिळुन आल्याने रेड कारवाई करून आरोपीकडुन सट्टापट्टीचे आकडे लिहीलेले एक कागद, निळ्या शाहीचा एक पेन कि. ५ रू. व नगदी ७४० रू. असा एकुण ७४५/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर